57

I. O. प्रत.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** घनसावंगी **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0083 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/03/2021 20:46 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्हाची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 25/03/2021
**Date To ( दिनांक पर्यंत):** 25/03/2021
**Time From (वेळेपासून):** 13:49 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 25/03/2021 **Time (वेळ):** 20:36 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 016 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/03/2021 20:39 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती घनसावंगी, रावार

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** जितेंद्र पिता दशरथ गाढे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | एकरुखा ताघनसावंगी जिजालना,धनसावंगी,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | एकरुखा ताघनसावंगी जिजालना,धनसावंगी,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.विजय मधुकर काळे | | | 1. पंचायत समिती घनसावंगी, रावार, धनसावंगी,जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना दिनांक 25.03.2021.मी जितेंद्र पिता दशरथ गाढे वय 36 वर्ष व्यवसाय शेती व ग्राम रोजगार सेवक रा.एकरुखा ता.घनसावंगी जि.जालना मोबाईल नंबर 7057084777.दिनांक 22.03.2021 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे पोलीस निरीक्षक श्री.एस.एस.शेख यांच्याशी फोनव्दारे संपर्क केला व त्यांना तक्रार असल्याचे सांगीतले त्यावरुन ते घनसावंगी येथे आले त्यांनी घनसावंगी ते अंबड जाणारे रोडवर घनसावंगी चौफुली येथे मी पण हजर आलो त्या ठिकाणी मी तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणी राहणारा असुन शेती काम व ग्राम रोजगार सेवक म्हणुन मौजे देवहिवरा येथे काम करुन कुटुंबाचा उदर निर्वाह करतो.माझी बहिण नामे श्रीमती मंगल विनायक शेळके ही सन 2015 ते 2020 या काळात मौजे देवहिवरा येथे सरपंच म्हणुन काम करीत होती.मी ग्राम रोजगार सेवक म्हणुन ग्राम पंचायत कार्यालय देवहिवरा येथेच असल्याने माझे बहिणीचे कार्यालयीन कामकाज मीच पाहत असतो.माझी बहिण ही सरपंच असताना मौजे देवहिवरा येथील दलित वस्ती सुधार पाणी पुरवठा योजने अंतर्गत कामे केलेले आहेत.सदर कामाचे पाणी पुरवठा विभाग पंचायत समिती घनसावंगी येथुन सुरक्षा ठेव (FSD) ची एकुण 11982/- रुपये मिळणे बाकी आहे.सदर रक्क्म परत मिळण्यासाठी पाणी पुरवठा विभाग,पंचायत समिती घनसावंगी येथे फाईल दाखल केलेली आहे.सदरचे दलित वस्ती सुधार पाणी पुरवठा योजने मधील सुरक्षा ठेव (FSD) ची रक्कम 11982/- रुपयाचे बिलाची फाईल मंजुर करुन मा.बिडीओ पंचायत समिती घनसावंगी यांच्या कडुन मंजुर करुन चेक काढुन देण्या करिता पाणी पुरवठा विभाग पंचायत समिती घनसावंगी येथील वरिष्ठ सहायक श्री.विजय काळे साहेब हे मला 1500/-रुपये मागणी करत आहेत तसेच वरिष्ठ सहायक श्री.काळे साहेब यांनी मला आज रोजी पंचायत समिती घनसावंगी येथील पाणी पुरवठा विभागात बोलावले आहे.ते मला पैशाची मागणी करणार आहेत. वरिष्ठ सहायक श्री.काळे साहेब यांना माझी लाच द्यायची इच्छा नाही परंतु मी लाच दिली नाही तर ते माझ्या बहिणीचे सुरक्षा ठेव (FSD) चे बिलाची फाईल मा.बिडीओ पंचायत समिती घनसावंगी यांच्या कडुन मंजुर करुन चेक काढणार नाही. वरिष्ठ सहायक श्री.काळे साहेब यांचेशी माझी वैयक्तीक दुश्मणी नाही, अगर देण्याघेण्याचा अथवा उसन वारीचा आर्थीक व्यवहार नाही.तसेच वरिष्ठ सहायक श्री.काळे साहेब हे मागणी करणार असलेले पैसे मी सोबत आणलेले आहेत.वरिष्ठ सहायक श्री.काळे साहेब हे माझ्याकडे मागत असलेले पैसे लाचेचे असल्याचे मला माहित आहे.सदर वरिष्ठ सहायक श्री.काळे साहेब यांनी मला लाचेची मागणी करुन ते स्वत: किंवा इतरा मार्फत स्विकारल्यास त्यांना पकडून कारवाई करावी अशी तक्रार तोंडी दिले वरुन त्यांनी त्यांचे जवळील लपटप वर टंकलिखीत करुन घेतली. माझ्या तक्रारी वरुन पोलीस निरीक्षक श्री. शेख साहेब यांनी मला दोन पंच व सापळा पथक यांच्यासोबत ओळख करून देवुन,श्री.विजय काळे, वरिष्ठ सहायक, पाणी पुरवठा विभाग,पंचायत समिती, घनसावंगी यांची पंचा समक्ष प्रत्यक्ष भेट घेवून व्हाईस रेकर्डरच्या साहाय्याने श्री.काळे यांची लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे पंच क्रं.1 श्री.मंगेश कोरडे यांना माझ्या सोबत दिले व पोलीस अमलदार श्री चेके यांनी व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझे जवळ दिला. मी व पंच क्रमांक 1 श्री कोरडे असे मोटार सायकलने



Scanned with CamScanner

60



पंचायत समिती, पाणी पुरवठा विभाग, घनसावंगी येथे त्यांना भेटण्यासाठी गेलो तेथे श्री.काळे यांची भेट झाली सदर भेटीमध्ये श्री.काळे यांनी माझ्याकडे माझ्या बहिणीचे सुरक्षा ठेव (FSD) चे बिलाची फाईल मा.बिडीओ पंचायत समिती घनसावंगी यांच्या कडुन मंजुर करुन चेक काढण्यासाठी पंच श्री कोरडे यांचे समक्ष 1000/- रु. ची लाचेची मागणी केली.व दोन दिवसांनी लाचेचे पैसे घेवुन येण्यास कळविले.दि. 22.03.2021 रोजी श्री विजय काळे यांनी 1000/-रु.लाचेची मागणी केल्या प्रमाणे आज दिनांक 25/03/2021 रोजी वरिष्ठ सहायक श्री. विजय काळे यांचे विरुध्द सापळा लावण्याचे ठरविले घनसावंगी येथे घनसावंगी ते जालना रोडवर सुरक्षीत ठिकाणी पोलीस निरीक्षक श्री.शेख हे पंचासह व टिमसह हजर आले. मी पण त्या ठिकाणी मोटार सायकलने आलो. शासकीय वाहनात मला व पंचांना अल्ट्राव्हाईलेट लम्प व अंथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन त्याबाबत माहीती देवुन त्याचे प्रात्यक्षीक दाखविले. मी लाचेची रक्कम एक हजार हजर केले असता श्री.विजय काळे यांना लाच म्हणुन देण्यासाठी सदर नोटांचे क्रमांक लिहुन घेवुन त्यास पंचा समक्ष अंथ्रासीन पावडर लावुन माझ्या पँटच्या उजव्या बाजुचे खिशात ठेवले व मला व दोन्ही पंचाना सुचना दिल्या व मला सुचना दिले की श्री.विजय काळे, वरिष्ठ सहायक,पाणी पुरवठा विभाग, घनसावंगी यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर खिशातील रुमालाने तोंड पुसायचे. त्यानंतर माझ्या कडे श्री चेके यांनी व्हाईस रेकर्डर चालु करुन दिला व पंच श्री.मंगेश कोरडे यांना मोटार सायकलवर श्री.विजय काळे, वरिष्ठ सहायक, पाणी पुरवठा विभाग, पंचायत समिती, घनसावंगी यांना भेटण्याठी रवाना केले व माझ्या मोटार सायकलच्या पाठीमागे सापळा पथक जिप आले व पंचायत समितीच्या आवारात सापळा लावण्यात आला. श्री. विजय काळे यांनी 13.49 वाजेच्या सुमारास माझ्या कडुन पंचायत समिती घनसावंगी येथील गट शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर लिंबाच्या झाडाखाली पंच साक्षीदार श्री.मंगेश कोरडे यांचे समक्ष श्री.विजय काळे यांनी माझ्या बहिणीचे सुरक्षा ठेव (FSD) चे 11982/- रु. बिलाची फाईल मा.बिडीओ पंचायत समिती घनसावंगी यांच्या कडुन मंजुर करुन चेक काढण्यासाठी 1000/- रुपयाची लाच उजव्या हाताने स्विकारली. व सदरची रक्कम त्यांनी त्यांचे शर्टाचे डावे बाजुचे खिशात ठेवली. त्यानंतर मी सापळा पथकास माझ्या खिशातील रुमाल काढुन तोंड पुसुन पुर्वनियोजीत इशारा केला असता पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब व स्टफ तसेच पंच नं.2.श्री. गोपालदास झुंजारे असे लगेच त्याठिकाणी येवुन, पंच क्र.1.श्री.मंगेश कोरडे यांना लाचेच्या रकमे बाबत विचारपुस करुन श्री.विजय काळे, वरिष्ठ सहायक यांचे बाबत माहीती विचारुन श्री.काळे यांना सापळा पथकाने पकडले. व माझ्या कडील व्हाईस रेकर्डर श्री चेके यांनी बंद केला. पोलीस निरीक्षक श्री.शेख साहेब यांनी श्री.विजय काळे यांना स्वतःची व सापळा पथकाची ओळख करुन देवुन त्यांना त्यांचे नाव,गाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री.विजय मधुकर काळे, वय 50 वर्षे, व्यवसाय नोकरी वरिष्ठ सहायक, पाणी पुरवठा विभाग, पंचायत समिती,घनसावंगी, रा.वार्ड क्रमांक 8, जाफ्राबाद, ता.जाफ्राबाद, जि.जालना असे सांगीतले. त्यांनी माझ्या कडुन स्वीकारलेले लाचेचे 1000/- रु.रक्कम पंचा समक्ष त्यांचे शर्टच्या खिशात ठेवलेले ते जप्त करुन ताब्यात घेतले व त्यानंतर मला व श्री.विजय काळे, वरिष्ठ सहायक यांना पाणी पुरवठा विभागचे कार्यालयात बोलावुन अल्ट्राव्हाईलेट लम्पच्या प्रकाश झोत माझ्या व श्री.विजय काळे, वरिष्ठ सहायक यांचे शर्ट चे खिशावर व हातावर टाकुन निरीक्षण केले असता माझे उजव्या हातावर व पँटचे उजव्या बाजुच्या खिशाचे तोंडावर व आतील बाजुस न्थ्रासिन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. शेख साहेब, सापळा पथक, दोन्ही पंच, श्री.विजय काळे, वरिष्ठ सहायक असे तेथुन निघुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे आलो. सर्व घटने बाबत त्यांनी त्यांचे लपटपवर सविस्तर पंचनामा करण्यात आला.मी दिलेली तक्रार संगणकावर टंकलिखीत करण्यात आली असुन ती मी वाचुन पाहिली ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.समक्ष ही फिर्याद दिली सही

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.) **or** (किंवा)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): RAVINDRA DEVIDAS NIKALJE
**Rank** (पद): I (Inspector) एस, एस, शेख
**No.**(क्र.): PI
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with CamScanner

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name**(नाव): shivaji [illegible] bantewad
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pr

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे, घनसावंगी

Scanned with CamScanner